# अर्थसंकल्पाने खाजगी विद्यापीठांना सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित करावे - डॉ. वेंकट रंगन

**मुंबई :** अर्थसंकल्पाने खाजगी विद्यापीठांना सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. भारतातील उच्च शिक्षणाची रुपरेषा निदर्शक स्थानांतरणातून चालली असून खाजगी विद्यापीठांसोबत दर्जा आणि मात्रेच्या बाबतीत लक्षणीय योगदान करु लागली आहे. यापैकी काही जागतिक मानांकनांमध्ये सर्वोच्च मानांकन लाभलेली भारतीय विद्यापीठे म्हणून उदयास आली आहेत. त्यांनी देशाच्या अनेक सुस्थापित विद्यापीठांना मागे टाकले आहे, असे अमृता युनिव्हर्सिटीचे (कोईम्बतुर) कुलगुरू डॉ. पी वेंकट रंगन यांनी म्हटले आहे. अशा उच्च मानांकित खाजगी विद्यापीठांनी त्यांच्या संशोधन क्षमतेमधील, प्रासंगिक आणि समर्पणाच्या अपेक्षा ओलांडल्या असून आपल्या समाजाच्या आव्हानांना सामोरे जाण्यात त्याचप्रमाणे उदयोन्मुख भारताच्या आवश्यकता पूर्ण करण्यात यश मिळवले आहे. शासनाने त्यांच्यावर पूर्ण विश्वास दाखवून त्यांच्या संशोधनाला प्रोत्साहन दिले पाहिजे आणि त्यांना देणग्यांच्या संधींसाठी तयार केले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.